दैनिक

# चकमक

शब्दांपेक्षा कृतीवर जास्त भर द्या,
कारण जग बोलणाऱ्याला नाही
तर करून दाखवणाऱ्याला मान देते.

संपादक : शामसुंदर चितोडा        कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

❊ वर्ष : ०१ ले ❊ | ❊ अंक : ८२ ❊ | ❊ शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ ❊ | ❊ जालना ❊ | ❊ किंमत : २ रूपये ❊ | ❊ पृष्ठे : ४ ❊

◎ Volume 01 ◎ | ◎ Issue 82 ◎ | ◎ Friday, Date : 23 October 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎ Price Rs. 2 ◎ | ◎ Pages 4 ◎

## पदवीधर मतदारांना मतदानासाठी चार तासांची विशेष सवलत द्या

### खाजगी आस्थापना, उद्योग व कार्यालयांना निवडणूक विभागाच्या सूचना



जालना/प्रतिनिधी : औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत पदवीधर मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी खाजगी आस्थापना, उद्योग, संस्था आणि कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या मतदारांना मतदानासाठी किमान चार तासांची विशेष सवलत द्यावी, अशा सूचना निवडणूक विभागाने दिल्या आहेत.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी मतदान शुक्रवारी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदानासाठी आवश्यक वेळ उपलब्ध करून देण्याचे आवाहन संबंधित आस्थापना व कार्यालयांना करण्यात आले आहे. यासंदर्भात जालना येथील उपजिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १३५-ब नुसार मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पात्र मतदारांना भरपगारी सुट्टी देण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २३ जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदवीधर निवडणुकीत मतदान करणाऱ्या मतदारांसाठी विशेष नैमित्तिक रजेबाबत तरतूद केली आहे. मात्र, खाजगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदानासाठी पुरेसा वेळ मिळावा, यासाठी संबंधित आस्थापनांनी विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.

खाजगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदानासाठी वेळ मिळावा, यासाठी संबंधित आस्थापनांना किमान चार तासांची विशेष सवलत देण्याबाबत सूचना द्याव्यात, असे निवडणूक विभागाने कळविले आहे. यापूर्वीही या संदर्भात संबंधित विभागांना पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या १६ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्रानुसार दोन तासांऐवजी चार तासांची विशेष सवलत देण्याबाबत पुन्हा स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व संबंधित खाजगी आस्थापना, उद्योग, संस्था आणि कार्यालयांनी या सूचनांची अंमलबजावणी करून पदवीधर मतदारांना मतदानासाठी आवश्यक वेळ उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची ग्रामीण रुग्णालय परतूर येथे अचानक भेट





जालना/प्रतिनिधी : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज ग्रामीण रुग्णालय, परतूर येथे अचानक भेट देऊन तेथील कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याचे तसेच काही आरोग्य कक्ष बंद असल्याचे आढळून आल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांची चांगलीच झाडाझडती घेतली. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे उपस्थित होते. जिल्हाधिकारी मित्तल यांनी रुग्णालयातील विविध विभाग, बाह्यरुग्ण कक्ष, औषध वितरण कक्ष तसेच संपूर्ण परिसरात फिरून पाहणी केली. कर्तव्याच्या वेळेत वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याचे तसेच काही कक्ष बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. उपस्थित कर्मचाऱ्यांकडून त्यांनी याबाबत सविस्तर माहिती घेतली व हजेरी नोंदवहीची तपासणी केली. या गंभीर बाबीची दखल घेत गैरहजर वैद्यकीय अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. रुग्णसेवेत कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही, अशी स्पष्ट ताकीद त्यांनी यावेळी दिली. रुग्णालयातील सर्व कक्ष ठरवून दिलेल्या वेळेत नियमितपणे सुरू ठेवावेत, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, रुग्णांना तत्पर व दर्जेदार सेवा द्यावी तसेच परिसराची स्वच्छता राखावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. ग्रामीण भागातील सामान्य व गरजू नागरिकांसाठी ग्रामीण रुग्णालय हा महत्त्वाचा आधार असून येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेळेत उपचार मिळालाच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. कामकाजात तात्काळ सुधारणा न झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले.

## ऑडिओ क्लिप प्रकरणात षडयंत्राचा संशय; उच्चस्तरीय चौकशीची अर्जुन खोतकर यांची मागणी

### 'मराठा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न दिसतो'; क्लिपची सायबर व फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणी करण्याची मागणी



जालना । प्रतिनिधी : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी समाजमाध्यमांसमोर सादर केलेल्या ऑडिओ क्लिप प्रकरणावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे. ही ऑडिओ क्लिप म्हणजे मोठे षडयंत्र असून, त्यातून मराठा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय जालना येथील शिवसेना (शिंदे गटाचे) आमदार तथा माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याची मागणीही त्यांनी केली. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना अर्जुन खोतकर म्हणाले की, ऑडिओ क्लिपमागील नेमके सत्य समोर येणे आवश्यक आहे. या प्रकरणाची तातडीने उच्च पातळीवर चौकशी झाली पाहिजे. 'दूध का दूध, पाणी का पाणी झाले पाहिजे,' असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. तसेच, संबंधित ऑडिओ क्लिपची सायबर तज्ज्ञ आणि फॉरेन्सिक लॅबच्या माध्यमातून तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही खोतकर यांनी केली. क्लिपची सत्यता, तिच्यातील आवाज आणि त्यामध्ये कोणत्याही (पान ३ वर)

## पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी मतदान केंद्र परिसरात निर्बंध लागू

जालना : ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये निर्बंध लागू करण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निष्पक्ष आणि निर्भय वातावरणात पार पडावी, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी तथा निवडणूक प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार हे निर्बंध लागू राहणार आहेत. या आदेशानुसार मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व पक्षांची कार्यालये, उमेदवारांचे मंडप आणि दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या परिसरात मोबाईल (पान ३ वर)

## भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी संपत टकले यांची फेरनिवड

### जालना जिल्ह्यातील युवा संघटन मजबूत करण्याची जबाबदारी; भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत कार्यकारिणी जाहीर

जालना प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बैठकीत भारतीय जनता युवा मोर्चाच्या जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी संपत भानुदास टाकले यांची फेरनिवड करण्यात आली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार तसेच युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णा महाडिक यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

जालना येथे जिल्हा संपर्कप्रमुख सुनील राणे यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे होते. यावेळी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, आमदार संतोष दानवे, भाजपचे जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष नारायण कुचे विलास बापू खरात सतीश घाडगे तसेच महापौर वंदना ताई मगरे उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



संपत टकले यांनी यापूर्वी युवा मोर्चाच्या माध्यमातून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी विविध उपक्रमांत सहभाग घेतला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. आगामी काळात जालना जिल्ह्यात युवा मोर्चाचे संघटन अधिक मजबूत करणे, युवकांना पक्षाच्या कार्याशी जोडणे आणि पक्षाचे विविध उपक्रम तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. या फेरनिवडीमुळे युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी संपत टकले यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मंठा तालुक्यात २१ व्या पशुगणनेच्या कामावर प्रश्नचिन्ह ; प्रत्यक्ष गावभेटी न झाल्याच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी

**गजानन माळकर पाटील तालुका : प्रतिनिधी मंठा** : पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या २१व्या पशुगणनेच्या कामात मंठा तालुक्यातील काही पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पशुगणना प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन करण्यात आली नाही व काही पशुपालकां कडे जनावरे नसतांना सुद्धा जनावरे ऑनलाईन करण्यात आले आहे.काही जुने पशुपालक मयत असुन सुद्धा त्यांच्या नावावर जनावरे घेण्यात आली आहे हा प्रकार सरसळ सरळ शासनाच्या डोळ्यात




धुळ झोकण्याचा प्रकार आहे. नविन पशुपालकांनी जनावरे घेतलेले असुन सुद्धा त्यांच्या पशुशुंची पशुगनना करण्यात आली नाही.आणि ज्यांच्याकडे जनावरे आहे अश्या बरेच पशुपालकांना यातुन वगळण्यात आले आहे., याबाबत शंका व्यक्त होत असून, या संपूर्ण प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे. मिळालेल्या आरोपांनुसार, मंठा तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांशी संबंधित काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष गावांमध्ये भेटी देऊन पशुधनाची माहिती संकलित केली नसल्याचा दावा केला जात आहे. त्याऐवजी काही खासगी व्यक्ती किंवा नियुक्त कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून दवाखान्यात बसून पशुगणनेची माहिती भरल्याचा आरोप आहे. मात्र, या आरोपांची अधिकृतरीत्या पडताळणी होणे आवश्यक आहे. २१वी पशुगणना ही ग्रामीण भागातील पशुधनाची संख्या, विविध पशुप्रजातींची उपलब्धता आणि (पान ३ वर)

### नेमकी पशुगणना कशी झाली, याची चौकशी व्हावी!

मंठा तालुक्यातील संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या पशुगणना नोंदी, गावनिहाय सर्वेक्षण अहवाल, नियुक्त कर्मचाऱ्यांची माहिती आणि ऑनलाइन नोंदवलेल्या आकडेवारीची तपासणी करण्यात यावी. आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष गावांमध्ये पडताळणी करून पशुगणना नियमानुसार झाली आहे की नाही, हे स्पष्ट करावे. या प्रकरणात कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन पारदर्शक चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जालन्यात 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' प्रदर्शन

जालना : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार वस्तू थेट उत्पादकांकडून खरेदी करता याव्यात, यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने जालन्यात 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन २ व ३ नोव्हेंबर २०२६ रोजी जुना जालना येथील उड्डाणपुलाजवळील स्वयंवर मंगल कार्यालयात सकाळी १० ते रात्री ९ (पान ३ वर)

## मॉडिफाइड सायलेन्सर वाहन विरुद्ध जालना शहर वाहतुक पोलिसांची विशेष मोहीम ११ वाहने ताब्यात घेऊन दंडात्मक कारवाई

जालना शहरातील गांधी चमन, शनी मंदिर, मामा चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री २१:०० ते २३:३० वाजेदरम्यान वरिष्ठांच्या पुलिस अधिकारी यांच्या आदेशानुसार मॉडिफाइड सायलेन्सर बसविलेल्या वाहनांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण ११ वाहने ताब्यात घेण्यात आली. संबंधित वाहनांवरील मॉडिफाइड सायलेन्सर काढून टाकण्यात आले असून



संबंधित वाहनधारकांविरुद्ध नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून मोठ्या आवाजाचे सायलेन्सर वापरणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे तसेच वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून ध्वनिप्रदूषण होणार नाही, याची (पान ३ वर)

## भाजपच्या जिल्हा सरचिटणीसपदी रमेश भापकर यांची फेरनिवड!

### वरिष्ठ नेतृत्वाकडून पुन्हा विश्वास; जालना जिल्ह्यात पक्ष संघटन मजबूत करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी

जालना/प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीच्या जालना जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने जिल्हा सरचिटणीसपदी रमेश भापकर यांची पुन्हा एकदा फेरनिवड करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. पक्ष संघटनेतील त्यांच्या कार्याची दखल घेत वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त केल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. जालना येथे आयोजित भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बैठकीत जिल्ह्याची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. जिल्हा संपर्कप्रमुख सुनील राणे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे होते. यावेळी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, आमदार संतोष दानवे, भाजपचे जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, नारायण कुचे, विलास बापू खरात, सतीश घाडगे, महापौर वंदना ताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पक्ष संघटनेतील कार्याची दखल रमेश भापकर यांनी यापूर्वीही भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून संघटनात्मक



कामकाजात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, कार्यकर्त्यांशी समन्वय साधणे आणि विविध पक्षीय उपक्रमांच्या अंमलबजावणीत सहभाग घेणे, अशा कामांमधून त्यांनी आपली भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्याकडे पुन्हा जिल्हा सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपविली आहे. संघटनात्मक राजकारणात पदाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. जिल्हा सरचिटणीस म्हणून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन आणि जिल्ह्यातील स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात समन्वय साधण्याची जबाबदारी भापकर यांच्यावर असेल. जिल्ह्यातील विविध भागांत पक्षाचे काम अधिक प्रभावीपणे पोहोचविणे, नव्या कार्यकर्त्यांना संघटनेशी जोडणे आणि बूथस्तरावरील संघटन अधिक सक्षम करणे, या बाबींना आगामी काळात महत्त्व राहणार आहे. आगामी राजकीय वाटचालीसाठी संघटन बळकटीचे आव्हान जालना जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आगामी काळात विविध उपक्रम राबविणे, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पाठपुरावा करणे, अशी अनेक आव्हाने पक्षासमोर आहेत. या पार्श्वभूमीवर रमेश भापकर यांची फेरनिवड महत्त्वाची मानली जात आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने दिलेली ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन संघटनात्मक कामाला गती देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील पक्षाची ताकद वाढविणे आणि संघटनेचा विस्तार करणे, या दृष्टीने त्यांच्या पुढील कामगिरीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष राहणार आहे. दरम्यान, फेरनिवड जाहीर झाल्यानंतर भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून रमेश भापकर यांचे अभिनंदन करण्यात आले. वरिष्ठ नेत्यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पक्ष संघटनेच्या आगामी वाटचालीसाठी नव्या उत्साहाने काम करण्याची तयारी कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

# संपादकीय

## मोठी गुंतवणूक

सरकारचे धोरण आणि घड्याळाचा लंबक यांच्यात साधर्म्य नसावे ही किमान अपेक्षा. दीर्घकालाचा विचार करते ते धोरण. लंबकासाठी क्षण हाच दीर्घकाल. तथापि सरकारचे धोरण असे क्षणोक्षणी इकडून–तिकडे जाणारे असेल तर त्यामुळे सगळ्याचा विचका होण्याचा धोका असतो. तो अनेक मुद्द्यांबाबत दिसत असला तरी तूर्त मुद्दा इथेनॉलचा. विद्यमान सरकारने मोठा गाजावाजा करत इथेनॉलला उत्तेजन देण्याचा निर्णय घेतला. साखर कारखानदारांनी आता साखरेऐवजी इथेनॉल तयार करावे; त्यात अधिक पैसा आहे, अशा गमजा मारल्या गेल्या. त्यावर विसंबून साखर कारखानदारांनी आपापल्या कारखान्यांत इथेनॉल निर्मितीसाठी अधिकची गुंतवणूक केली. इथेनॉल हे धोरण म्हणून किती योग्य याची स्वकौतुकेही अनेकांनी केली. वाहतूकमंत्री म्हणून वास्तविक काहीही खाते–संबंध नसताना नितीन गडकरी यांनी इथेनॉल श्रेय गंगेचा प्रवाह आणखी रुंद केला. इतकेच नव्हे; आता देशात केवळ इथेनॉल निर्मितीत गुंतवणूक होणार अशी परिस्थिती निर्माण झाली. या इंधन–पूरक द्रवाबाबत असे सगळे छान आणि गोड गोड सुरू होते. आणि आता सरकार म्हणते साखर कारखान्यांतील इथेनॉल नको! सरकारचा हा धोरण–लंबक या मुद्द्यावर आता इतका दूर गेला की उसापासून, मळीपासून साखर–द्रावापासून इथेनॉल निर्मितीला बंदीच करण्यात आली असून येत्या आर्थिक वर्षात फक्त मका–धारित इथेनॉलला प्राधान्य दिले जाणार आहे. सरकारला ही अचानक उपरती होण्याचे कारण म्हणजे सध्या महाराष्ट्रात आणि कमी–अधिक प्रमाणात अन्यत्रही असलेली दुष्काळी स्थिती. या काळात किमान पिण्याच्याही पाण्याचे वांधे होण्याची शक्यता असताना इंधनासाठी जलशोषी ऊस पिकवणे योग्य नाही, असे सरकारला वाटले. खरे तर आपल्यासारख्या पावसाधारित प्रदेशांत इथेनॉलसाठी ऊस–पिकास उत्तेजन देणे योग्य नाही, हे सामान्यज्ञान. ‘लोकसत्ता’ने विविध संपादकीयांतून हा मुद्दा वारंवार मांडला. पण त्याबाबत सरकारच्या डोक्यात प्रकाश पडण्यासाठी दुष्काळ पडावा लागला. अशा वेळी ‘लोकसत्ता’ने घेतलेली भूमिका किती योग्य होती हे अधोरेखित करण्याची गरज नाही. परंतु तरी सरकारच्या भूमिकेवर भाष्य आवश्यक ठरते. त्याची प्रमुख कारणे दोन. पहिला मुद्दा साखर कारखान्यांनी सरकारवर विसंबून केलेल्या गुंतवणुकीचे काय; हा. आणि दुसरा अधिक महत्त्वाचा. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रूबिओ हे उभय देशांतील करारासंदर्भात आणि त्यातही इंधन व्यवहाराबाबत भाष्य करत असताना त्या पार्श्वभूमीवर इथेनॉलसाठी मका वापरण्याचा निर्णय अनेक शंकांस जन्म देतो. प्रथम मक्याविषयीच्या ताज्या निर्णयाविषयी.

केंद्र सरकारतर्फे पुढील महिन्यापासून नव्या हंगामाची, म्हणजे नोव्हेंबर २०२६ ते पुढील वर्षाचा ऑक्टोबर या कालासाठी, इथेनॉल खरेदी सुरू होईल. तीत ११०० कोटी लिटर (११ बिलियन लिटर) इथेनॉल सरकार खरेदी करेल. पण अट एकच. हे इथेनॉल उसापासून बनवलेले असता नये. उसाखालोखाल इथेनॉलसाठी सर्वाधिक वापरला जाणारा घटक म्हणजे मका. आपल्याकडेही इथेनॉलसाठी आवश्यक मका पिकवण्याकडे शेतकर्यांचा कल अधिक दिसून येतो. ते ठीक. पण त्यामुळे तेलबिया, डाळी इत्यादी खर्या जीवनावश्यक पिकांकडे अधिक दुर्लक्ष होऊ लागल्याचे दिसून येते. मक्याखालील क्षेत्र गेल्या दोन वर्षांत जवळपास आठ टक्क्यांनी वाढले. पण याच काळात आपणास एक कोटी ६० लाख टन खाद्य तेल आयात करावे लागले; त्याचे काय? याच काळात आपल्यावर ७५ लाख टन डाळी आयात करण्याची वेळ आली. वास्तविक विद्यमान सरकारने २०१४ साली तेलबिया, डाळी यांत स्वयंपूर्णता आणण्याच्या उद्देशाने मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्याची उत्तम प्रसिद्धी केली. पण अन्य अनेक घोषणांप्रमाणे ती हवेत विरली असावी. कारण या काळात उलट आपली खाद्य तेल आणि डाळी यांची आयात वाढली. म्हणजे एक वाचवायला जावे तर दुसरे अडचणीत येते अशी स्थिती. अशा वेळी कशासाठी काय आणि किती वाचवायचे याच्या नफ्या–तोट्याचा विचार आपण करणार की नाही, हा प्रश्न. तो पडण्याचे कारण म्हणजे इथेनॉलचा एकूणच आतबट्ट्याचा व्यवहार. ‘‘इथेनॉलचा विचार पेट्रोल–डिझेलचा पर्याय म्हणून करणे ही या विश्वाच्या इतिहासातील अत्यंत बिनडोक कल्पना आहे’’ असे गुंतवणूक गुरू वॉरेन बफे यांचे साथीदार आणि त्यांच्या ‘बर्कशायर हॅथवे’ कंपनीचे एकेकाळचे उद्याधिकारी चार्ली मंगेर हे म्हणत. भारताचा विचार करायचा तर हे विधान खरे ठरते. कारण इथेनॉलची निर्मिती ही कमालीची पर्यावरण–खर्चीक आहे. एक हजार लिटर इंधन–योग्य इथेनॉल तयार करावयाचे असेल तर त्यासाठी किमान १४ हजार किलो (१४ टन) इतका ऊस गाळावा लागतो. आणि इतके इथेनॉल साखरेपासून करावयाचे तर किमान १८०० किलो किण्वनक्षम (फर्मेंटेबल) साखरेची गरज असते. म्हणजे आधी प्रचंड पाणी पिणारा ऊस पिकवायचा, त्यातून इथेनॉल बनवायचे, दूध आटवून बासुंदी करावी तसे हे इथेनॉल आटवून त्यास इंधनयोग्य बनवायचे असे हे सव्यापसव्य. हे का करायचे? तर त्यास ऊर्जा–पूरक बनवण्यासाठी. त्यासाठी आधीच मुळात प्रचंड ऊर्जा लागते त्याचे काय? या तुलनेत तांदूळ वा मका यापासून इथेनॉल निर्मिती जरा बरी. म्हणजे तेथे एका टनापासून ४७५ लिटर इतके इथेनॉल बनते. तथापि आपल्याकडे ऊस हे आपल्या इथेनॉल निर्मितीचे पारंपरिक साधन. महाराष्ट्रातील बहुतांश साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीत मोठी गुंतवणूक केली.

# जगाची वाटचाल तिसऱ्या महायुध्दाकडे;तरीही संयुक्त राष्ट्रसंघबघ्याच्या भूमिकेत?

जगातील काही भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे व याचा गंभीर परिणाम जगातील तळागाळातील देशांवर होत आहे.याबाबी संयुक्त राष्ट्र उघड्या डोळ्यांनी पहात आहे. परंतु यावर तोडगा किंवा कोणतीही कठोर निर्णय घेतांना दिसत नाही ही जगासाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. २०20 मधील अजरबैझान–आर्मेनिया युद्ध ,२०२१ चे अफगाणिस्तान–तालिबान युद्ध,२०२२ पासुन आतापर्यंत सुरू असलेले रशिया–युक्रेन युद्ध आणि आता नुकताच सुरू झालेले हमास–हिज्बुल्ला–इराण–इस्रायल–अमेरिकेचा भयावह संघर्ष यामुळे जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. अशा भयावह स्थितीमध्ये परमाणू युध्दाची शक्यता नाकारता येत नाही. कारण हे युद्ध आता हमास–हिज्बुला –इराण–अमेरिका–इस्त्रायल युद्ध किंवा रशिया–युक्रेन युद्ध सीमित रहाले नसुन महायुद्धाची नांदी आहे.अशा परिस्थितीत तिसऱ्या महायुध्दाची ठीनगी केव्हाही उडु शकते व आगीचा गोळा बनु शकते याला नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे चीन–तैवान संघर्ष सुरूच आहे आणि आता अफगाणिस्तान व पाकिस्तान यांचाही संघर्ष टोकाला पोहोचला आहे.अशा भयावह स्थितीत तिसऱ्या महायुद्धाची पुणरावृत्ती होणार नाही याची दक्षता संयुक्त राष्ट्रसंघानेघेतली पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका संथगतीने दिसत आहे.यामुळे जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत गेल्या चार वर्षांपासून रशिया –युक्रेन युद्ध किंवा आता सुरू असलेला हमास–हिज्बुल्ला– इराण–इस्त्रायल–अमेरिका संघर्ष किंवा अफगाणिस्तान–पाकिस्तान संघर्ष जगाला केव्हाही हादरा देवू शकतो .सध्या निर्माण झालेली जगातील विध्वंसकारी परीस्थिती पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने मानव कल्याणासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.परंतु संयुक्त राष्ट्रसंघाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे.आज संयुक्त राष्ट्रसंघ ८१ वर्षांचा झाला असला तरीही जगात संघर्ष कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना अनेक देशांतील घडामोडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असते.पहिल्या महायुद्धानंतर १९२९ मध्ये राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली.परंतु राष्ट्रसंघ प्रभावहीन असल्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघटनेची२४ आक्टोंबर १९४५ ला स्थापना करण्यात आली.यावेळी संयुक्त राष्ट्र अधिपत्रावर ५0 देशांच्या सह्यानीशी याची स्थापना करण्यात आली.परंतु आता जगातील अनेक देश संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य आहेत. यामुळे प्रत्येक देशाला आप–आपल्या तक्रारी मांडन्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघटनेने दिलेला आहे.युध्द जन्य परीस्थिती,भुकमरी, कुपोषण,मानवधिकार,अंतराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि विश्व शांति इत्यादी संपूर्ण बाबींनवर चर्चा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून केली जाते.दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी झालेल्या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्राला आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेचा उद्देश हा आहे की भविष्यात द्वितीय महायुध्दासारखी महाभयानक परीस्थिती उदभवु नये या उद्देशाने याची स्थापना करण्यात आलेली आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेची संरचना शक्तीशाली देश अमेरिका,फ्रांस,ब्रिटन,रूस आणि संयुक्त राजशाही यांनी द्वितीय विश्व युध्दात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली होती.सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये १९३ पेक्षा जास्त देश आहेत.जगातील सर्वच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त देश या संस्थेशी जुडुन आहेत.या संस्थेची संरचना,आम सभा,सुरक्षा परिषद,आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय या संपूर्ण बाबीं या संस्थेमध्ये आहेत.संयुक्त राष्ट्र संघटना ही एक चांगली आंतरराष्ट्रीय उपयोगी संघटना आहे. गेल्या २० वर्षापासुन अफगाणिस्तानमध्ये अमेरिका व नाटोची सेना होती.यामुळे अफगाणिस्तानचे नागरिक स्वतःला सुरक्षित समजत होते.परंतु अमेरिकेने २०२१ मध्ये आपले सैन्य माघारी बोलावल्यामुळे अवघ्या १०० दिवसात खुनी तांडव निर्माण होवून लाखो निरअपराध्यांचा बळी तालिबानी आतंकवाद्यांनी घेतला व अफगाणिस्तानवर संपूर्ण कब्जा मिळविला आणि अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले.परंतु यात संयुक्त राष्ट्र संघाने थोडासाही हस्तक्षेप केला नाही ही संयुक्त राष्ट्रसंघाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.संयुक्तराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तान नेहमी भारताच्या विरूद्ध चिखल फेक करीत असतांना दीसुन येते.सिरियामधील अत्याचाराच्या घटना संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडुन या घटना जम्मु काश्मिरमध्ये घडत असल्याचे सांगून भारत मानवाधिकाराचे उल्लंघन करीत असल्याचा पोपोगंडापाकिस्तान नेहमीच करीत असतो. कारण भारतीय घटनेतील ३७० व ३५ ए कलम हटविल्याचे दु:ख पाकिस्तानला जास्तच होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा मुद्दासुध्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये अनेकदा नेलेला आहे.परंतु संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानचे संपूर्ण आरोप फेटाळून लावले.आज संयुक्त राष्ट्र संघ नसता तर जगामध्ये अनेक देशात आपसा–आपसात गृहयुद्ध पहायला मिळाली असती. कारण आज जगातील संपूर्ण राष्ट्रे बारूदच्या ढीगाऱ्यावरबसली आहेत व एकमेकांना धमकी देताना दिसतात. परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून अनेक राष्ट्रांमध्ये होत असलेला संघर्ष व कटुता दुर करण्याचे काम आज संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे.आज उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात नेहमी तनातनीचे वावरत दिसायचे परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून यावर तोडगा काढण्यात आला व युध्दजन्य परीस्थिती हाताळण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघटनेने केले.उत्तर कोरियाचा तानाशहा किंम जोंग उन हा नेहमी अमेरिकेला युध्दाची धमकी देत असतो आणि आताही देतो.परंतु संयुक्त राष्ट्रसंघटना याला हाताळण्याचे काम करीत असते.2020 मध्ये अजरबैझान –आर्मेनिया यांच्यातील संघर्ष टोकाला गेला होता. यांच्या संघर्षामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल जगावर दिसत होते. कारण अजरबैझान–आर्मेनिया यांचा संघर्ष गेल्या १०० वर्षांपासून सुरू आहे.हा संघर्ष थांबावा याकरिता अमेरिका व रशिया कसोटीचे प्रयत्न करीत होते परंतु युद्ध थांबे ना!यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने अजरबैझान–आर्मेनिया यांच्यातील संघर्ष थांबवीण्या करीता युध्दपातळीवर प्रयत्न करून युद्ध थांबवीले. अन्यथा मुस्लिम राष्ट्र विरूद्ध ईसाइ राष्ट्र अशी युद्धाची स्थिती उद्भवण्याची शक्यता होती.अशी कठीण परिस्थिती निवळण्याकरीता संयुक्त राष्ट्र संघानेटोकाची भूमिका घेने गरजेचे असते. चीनची विस्तारवादी नीती रोखण्याकरीता व पाकिस्तानच्या आतंकवादी कारवाया रोखण्याकरीता पश्चिम आशियात नवे क्वाड स्थापन करण्यात आले आहे यात भारत,अमेरिका,ऑस्ट्रेलिया आणि जापान हे देश आहेत यामुळे आशिया खंडात शांतता प्रस्थापित करण्यास मोठी मदत होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघ जरी ८१ वर्षांचा झाला असला तरी त्यात नवीन उर्जा निर्माण करून जगातील संघर्षमय वातावरण यावर ताबडतोब अंकुश लावण्याची गरज आहे.कारण संयुक्त राष्ट्र संघाने अनेक महत्वपूर्ण कार्य केले आहे याचे उदाहरण जगापुढे आहे. पाकिस्तान आताही खुंखार आतंकवाद्यांना खत पाणी घालत आहे व भारत विरोधी कारवाईला अंजाम देण्याचे काम नेहमीच करीत असतो.परंतु भारत त्याला जशास तसे उत्तर देऊन त्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम करीत असतो.संयुक्त राष्ट्रसंघटनेला भारताने सीध्द करून दाखवले की भारत विश्वामध्ये शांती प्रस्थापित करू शकते.भारताचे प्रखर नेत्यृत्व व प्रखर विचाराने संपूर्ण संयुक्त राष्ट्रसंघनेतील १९३ देश प्रभावीत आहे.त्यामुळेच आज भारताची मान उंचावली आहे. भारत कोणाच्याही सुख दुःखात नेहमीच सहभागी होत असतो. कारण कठीण घडीला मदत करने ही बाब भारताच्या संस्कृतीमध्ये, सभ्यतेमध्ये व रक्ता–रक्तामध्ये आहे. हीबाब इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी,सुष्मा स्वराज,नरेंद्र मोदी यांनी सीध्द करून दाखविली.भारताने नेहमी मानवाच्या कल्याणासाठी व हीतासाठी आवाज बुलंद केला आहे यात पर्यावरणाचा मुद्दा, ग्लोबल वॉर्मींग व निसर्गाची ढासळती परीस्थिती या संपूर्ण बाबींवर भारताने संयुक्त राष्ट्राचे लक्ष केंद्रित केले आहे.भारताने आणि संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानला नेहमी रक्ताच्या थारोळ्यातुन बाहेर काढण्याचे प्रयत्न सुध्दा केले आहे. परंतु पाकिस्तानच्या वागनुकीवरून असे दीसुन येते की कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच यामुळे पाकिस्तानने आतातरी सुधरूण जावे अन्यथा पाकिस्तानचा विनाश अटळ आहे.आज जगात कोणत्याही देशांशी वैरत्व करने म्हणजे तिसऱ्या महायुद्धाकडे वळने होय.देशा–देशामध्ये कटुता निर्माण होवु नये किंवा कटुता निर्माण झाली तर ती निवळण्याकरीता आज संयुक्त राष्ट्र संघटना रोखठोक भुमिका बजावण्याचे काम करीत आहे.अन्यथा महायुद्ध केंव्हाही उद्भवले असते.परंतु यावर ब्रेक आणि लगाम लावण्याचे काम संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे. म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून जनकल्यानाचे काम मोठ्या प्रमाणात होतांना दीसते.गेल्या ७९ वर्षांपासून भारता विरुद्ध पाकिस्तानच्या कुरापती सुरूच होत्या आणि आहे.परंतु भारताने पाकिस्तानची पोल खोलल्याने संयुक्त राष्ट्र संघानेपाकिस्तानला आता पंगु केल्याचे दिसून येते.त्यामुळे संयुक्त राष्ट्राने आनखी कडक प्रतीबंध लावुन पाकिस्तानला त्याची जागा दाखविली पाहिजे.आज संयुक्त राष्ट्रसंघाच्या नजरेत भारत विश्वशांतीचा दुत असल्याचे संबोधले जाते. आज जगातील देशांकरीता काही निर्णय घ्यायचा असला तर सर्वप्रथम संयुक्त राष्ट्र संघ भारताशी संवाद करून निर्णय घेत असतो. संयुक्त राष्ट्र संघटनाही जगाला जिवनदान देणारी संस्था असल्याचे मी समजतो. परंतू सध्याच्या इजरायल–हमास–इराण–हिज्बुल्ला–अमेरिका व रशिया –युक्रेन युद्ध याबाबत कठोर पाऊल न उचलता संयुक्त राष्ट्र संघ बघ्याची भूमिका घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.२१ व्या शतकात मानवी युध्दापेक्षा आता द्रोणनेयुध्द सुरू झाल्याचे दिसून येते. द्रोणचे युध्द जगाला घातक सीध्द होवु शकते व होत आहे आणि जगाला विनाशाकडे नेत नाही. कारण अत्याधुनिक युगात संपूर्ण देश सध्याच्या परीस्थितीत अत्याधुनिक शस्त्र सामग्री, अनुबॉम्ब, मीसाईल, बॅलेस्टीक, क्लस्टरबॉम्ब, अणुबॉम्ब,अत्याधुनिक द्रोण,अशाप्रकारचे विनाशकारी आणि घातक शस्त्र सामग्री जगातील संपूर्ण देशांनी अवगत केली आहे.आज संपूर्ण देश अत्याधुनिक द्रोण खरेदीच्या शर्यतीत आहे व प्रत्येक देश यात सामोरं जाण्याच्या शर्यतीत आहे.यावर संयुक्त राष्ट्रसंघाने लक्ष ठेवण्याची गरज आहे.अन्यथा पृथ्वीचा विनाश दुर नाही.१९४५ ला संयुक्त राष्ट्रांची परीस्थिती वेगळी होती.परंतु गेल्या ५ वर्षात संपूर्ण जगात अत्यंत संघर्षमय, युद्धजन्य व भयावह वातावरण निर्माण झाले आहे.याकरीता संयुक्त राष्ट्र संघाला आणखी कडक नियमावली तयार करून जगातील खुनी संघर्ष थांबवीलाच पाहिजे. १९४५ च्या नंतरची आव्हाने आवश्यकतेनुसार वेगळी होती.परंतु आज संपूर्ण जगापुढे वेगळे आव्हान आहे.पण ज्या हेतूने संयुक्त राष्ट्रांची स्थापणा झाली तो हेतू आजही आहे का ?असा प्रश्न जगापुढे उपस्थित आहे.जगात पुर्वीही गृह युद्ध व्हायची आणि आजही अनेक देशांमध्ये गृहयुद्ध सुरू आहे.परंतु आजचे गृह युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने वाटचाल करतांना दिसत आहे. आज संपूर्ण जगावर संयुक्त राष्ट्र संघाचे नियंत्रण असने गरजेचे आहे. संयुक्तराष्ट्र संघाची स्थापना यासाठीही करण्यात आली की दुसऱ्या महायुद्धासारखी परीस्थिती पुन्हा उदभवु नये.परंतु दु:खाची बाब म्हणजे आज संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेआहे. जगातील बदलता काळ पहाता व युध्दाची गंभीर परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्र संघाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण जग युध्दाच्या खाईत लोटल्या जात आहे.त्यामुळे २४ आक्टोंबर संयुक्त राष्ट्र दिवसलक्षात घेता कठोर पाऊल उचलुन जगातील युद्धजन्यपरीस्थिती रोखली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत जगात दुसऱ्या महायुद्धापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. रशिया–युक्रेन व हमास– हिज्बुल्ला–इराण–इस्त्रायल–अमेरिका युध्दामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल संपूर्ण जगभर दीसत आहे.ज्या उद्देशासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली व सध्याच्या परिस्थितीत ज्या पद्धतीची युद्धजन्य परिस्थिती काही राष्ट्रांमध्ये निर्माण झाली आहे त्याबाबतीत ती हाताळण्यात संयुक्त राष्ट्रसंघ प्रभावहिन दिसत आहे. त्यामुळे सध्याची कठीण परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्र संघाने शांतता प्रस्थापित करण्यासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.अन्यथा पृथ्वीचा व संपूर्ण जीवसृष्टीचा विनाश अटळ आहे.

जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.**9921690779,**नागपूर.**

# रेल्वे प्रशासनाकडून विशेष सुरक्षा उपाय लागू

दरवर्षी या काळात उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालकडे जाणाऱ्या चाकरमान्यांची संख्या प्रचंड असते. उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर साजरी होणारी छठपूजा आणि दिवाळीच्या सुट्यांमुळे पुढील महिनाभर स्थानकावर हीच गर्दी कायम राहण्याची शक्यता आहे. पुणे : दिवाळीचा सण आणि पाठोपाठ येणारी छठपूजा यामुळे सध्या पुणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांचा अक्षरशः लोट लोटताना दिसत आहे. दरवर्षी या काळात उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालकडे जाणाऱ्या चाकरमान्यांची संख्या प्रचंड असते. उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर साजरी होणारी छठपूजा आणि दिवाळीच्या सुट्यांमुळे पुढील महिनाभर स्थानकावर हीच गर्दी कायम राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, कोणतीही अनुचित घटना किंवा चेंगराचेंगरीची दुर्घटना टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने कंबर कसली असून कडक नियोजन सुरू केले आहे. गाडी फलाटावर लागण्यापूर्वीच प्लॅटफॉर्मवर होणारी अनावश्यक गर्दी रोखण्यासाठी प्रशासनाने एसटी बसस्थानकाजवळ (व्हीआयपी कक्षाशेजारी) एका विशेष ‘होल्डिंग झोन’ ची उभारणी केली आहे. ज्या प्रवाशांचे रेल्वे तिकीट कन्फर्म आहे, अशाच प्रवाशांना थेट फलाटावर प्रवेश दिला जाणार आहे. तर प्रतीक्षा यादीतील किंवा अनारक्षित तिकीट असलेले प्रवासी या होल्डिंग झोनमध्ये थांबतील. याठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतेची चोख व्यवस्था करण्यात आली आहे, जेणेकरून गाडी येण्याच्या वेळेसच प्रवाशांना शिस्तीत फलाटावर सोडता येईल. प्रवाशांची वाढती आवक लक्षात घेता रेल्वे सुरक्षा दल (ठझ्रऋ) आणि स्थानक प्रशासनाचे अधिकारी २४ तास तैनात असणार आहेत. गर्दी प्रमाणाबाहेर वाढल्यास स्थानकावर गर्दी होऊ नये म्हणून 'फलाट तिकीट’ विक्री तात्पुरती बंद करण्याचा कठोर निर्णयही प्रशासनाकडून घेतला जाऊ शकतो. तसेच, उत्तर भारताकडे जाणाऱ्या गाड्यांच्या वेळी प्रवाशांची रांग शिस्तबद्ध राहावी म्हणून फलाट क्रमांक एकवर विशेष बॅरिकेडिंग व रांगेची व्यवस्था करण्यात आली आहे. पुणे रेल्वे स्थानकावरून दररोज लाखो नागरिक प्रवास करतात. सध्या स्थानकावर एकूण ६ फलाट असून येथून रोज तब्बल ११७ गाड्या सुटतात, तर २७९ गाड्यांची ये–जा असते. येथील दैनंदिन प्रवासी संख्या ही सुमारे १ लाख ९० हजार इतकी प्रचंड आहे. ही गर्दी लक्षात घेता, प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून सध्या कार्यरत असलेल्या ९ तिकीट खिडक्या आणि १८ स्वयंचलित तिकीटविक्री यंत्रांच्या संख्येमध्ये वाढ करण्याचे नियोजन रेल्वे विभागाने केले आहे. प्रशासनाचे आवाहन : प्रवाशांच्या सुरक्षेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी प्रवाशांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि आपल्या प्रवासाच्या वेळेनुसार योग्य ती काळजी घ्यावी, अशी माहिती पुणे रेल्वे विभागाचे जनसंपर्क अधिकारी हेमंतकुमार बेहेरा यांनी दिली आहे.

# विजयादशमी निमित्त;रावण दहणाचा कार्यक्रम राजीव गांधी पार्क गणेशनगर,नागपूर येथे उत्सहात संपन्न

गेल्या २३ वर्षांपासून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रावण दहणाचा कार्यक्रम राजीव गांधी पार्क,गणेशनगर,नागपूर येथे नवज्योत क्रीडा मंडळ व आयोजक श्री प्रशांत धवड मित्र परिवारा तर्फे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मान्यवरांचे विजयादशमी निमित्त सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पत्रकार रमेश लांजेवार यांनी केले. विजयादशमी निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयजी महाकाळकर (नागपूर महानगरपालिका विरोधी पक्ष नेते) हे होते.व प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक श्री अतुलजी कोटेचा, श्री अतुलजी लोंढे कॉंग्रेस प्रदेश प्रवक्ता यांच्यासह अनेक मान्यवरांनी विजयादशमीच्या शुभ पर्वावर आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये आयोजक प्रशांतजी धवड,अशोकजी दलाल, डॉ. उत्तमराव तुरणकर,राजुभाऊ खोपडे,एकनाथ काळमेघ यांनी या निमित्ताने आपली प्रखर भुमिका मांडली.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीमध्ये मुरमे गुरूजी,शिरीष लड्ढा,रघुविरसिंग ठाकुर, लक्ष्मीकांत ठाकरे,





आपला हितचिंतक
रमेश लांजेवार
मो.नं.9921690779, नागपूर.



योगेश बावनकर, विलास गावंडे, जनार्दन चरडे, छोटुभाऊ गुरव, प्रविण भोयर, फोटोग्राफर विलास घोराडकर,प्रमोद काकड़े, अनिलजी तिवारी, सुवर्णाताई भोयर, अर्चना गोल्हर, अंजली ठाकरे, जसपाल जाधव, शुभम रणदिवे, श्रीकांत धांडे, सह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी सय्यदभाई डेकोरेशन वाले यांनी गणेशनगर परिसर रोशनाईच्या माध्यमातून तिरंगामय भव्य सजावट करून सर्वांना आकर्षित केले व कारवटकर याचा भव्य फटकाशोमुळे संपूर्ण परिसर आनंदमय झाला.त्यानंतर रावण दहन करण्यात आले.या संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद परिसरातील संपूर्ण नागरिकांनी मोठ्या उत्साहाने घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन एकनाथजी काळमेघ यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# सीबीजी प्रकल्पांना राज्य शासनाकडून ५०० कोटींची तरतूद : उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर

मुंबई, दि. २२ : शहरांतील कचरा आणि कृषी अवशेषांपासून स्वच्छ इंधन व सेंद्रिय खतनिर्मितीला चालना देण्यासाठी राज्य शासनाने संपीडित जैववायू (सीबीजी) प्रकल्पांसाठी २०२६-२७ या आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपयांचा निधी निर्धारित केला आहे. प्रकल्पाच्या प्रतिदिन प्रतिटन क्षमतेमागे ७५ लाख रुपयांपर्यंत, तर प्रत्येक प्रकल्पाला कमाल १५ कोटी रुपयांपर्यंत व्यवहार्यता तफावत निधी मिळणार आहे. या धोरणामुळे कचऱ्याचे आर्थिक मूल्य वाढण्यासह खासगी गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे, अशी माहिती नगर विकास विभागाचे उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी दिली. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या वतीने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनच्या सहकार्याने मुंबईतील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये आयोजित गोबरधन योजना, आदर्श राज्य संपीडित जैविक वायू धोरण आणि सॅस्की २०२६-२७ या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळेत गोबरधन, आदर्श राज्य सीबीजी धोरण आणि राज्यांच्या भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना (एसएएससीआय) याविषयी सादरीकरण करून राज्य शासनाच्या धोरणाची माहिती दिली. राज्यातील २९ महानगरपालिका, २४८ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायती अशा ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात दररोज २४ हजार ८५९ टन कचरा निर्माण होतो. त्यात १३ हजार ६७३ टन ओला आणि ११ हजार १८६ टन सुका कचरा आहे. या कचऱ्यासह कृषी अवशेष, पशुधनाचे शेण, बाजार समित्यांतील कचरा, साखर उद्योगातील उपपदार्थ आणि जैवभारापासून सीबीजी निर्मिती केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. किमान २० टन क्षमतेचे प्रकल्प सीबीजी प्रकल्पांची किमान क्षमता प्रतिदिन २० टन असेल. ग्रीनफिल्ड व ब्राऊनफिल्ड प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी किंवा हायब्रिड न्युइटी मॉडेलद्वारे उभारता येतील. लहान शहरांसाठी समूहाधारित प्रकल्पांनाही प्रोत्साहन मिळेल. प्रकल्पाच्या प्रतिदिन प्रतिटन क्षमतेमागे एक एकर या प्रमाणात किमान एक व कमाल २० एकर जमीन देता येईल. जमिनीच्या रेडी रेकनर दराच्या ०.७ टक्के दराने भाडेपट्टा आकारला जाईल आणि दर तीन वर्षांनी त्यात पाच टक्के वाढ होईल. प्रकल्प सुरू झाल्यानंतर २.५ टक्के राज्य जीएसटी परतावा, टिपिंग शुल्क तसेच पाणी व वीज सुविधा देण्याची तरतूद असल्याचेही जेवळीकर यांनी सांगितले.

शेतकरी उत्पादक संस्था आणि महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून जैवभार संकलन केले जाणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्या, गोशाळा आणि साखर कारखान्यांशी दीर्घकालीन पुरवठा करार करून कच्च्या मालाची उपलब्धता सुनिश्चित केली जाणार आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

**केंद्राकडून २०० कोटींपर्यंत सह-वित्तपुरवठा**

एसएएससीआय योजनेअंतर्गत राज्य सीबीजी धोरण सुसंगतीसाठी १,३०० कोटी, सज्जता निर्देशांकासाठी ५०० कोटी आणि वित्तीय सह-वित्तपुरवठ्यासाठी १,२०० कोटी रुपयांची तरतूद आहे. महाराष्ट्राचा 'अ' श्रेणीत समावेश असून, धोरण सुसंगतीसाठी कमाल १०० कोटी, सज्जता निर्देशांकात पहिल्या तीन राज्यांत स्थान मिळाल्यास ७५ कोटी आणि वित्तीय सह-वित्तपुरवठ्यासाठी २०० कोटी रुपयांपर्यंत मदत मिळू शकते. ही मदत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर उपलब्ध आहे. सीबीजी सज्जता निर्देशांकात प्रत्यक्ष जमीन वाटपाला ३० गुण, उत्पादन क्षमता विस्तार आणि पाइपलाइन जाळ्यातील वाढ यांना प्रत्येकी २० गुण, तर सवलतीचा जमीन भाडेपट्टा, कच्चा माल संकलक आणि उपपदार्थांचा वापर यांना प्रत्येकी १० गुण आहेत.

**एक खिडकी मंजुरी अनिवार्य**

या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा जैव-सीबीजी समन्वय समित्या, नगर विकास विभागाच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती कार्यरत राहणार आहे. या यंत्रणांमार्फत जमीन वाटप, प्रकल्प मंजुरी, विभागीय समन्वय आणि प्रगतीचा आढावा घेतला जाईल. एसएएससीआयच्या पात्रतेसाठी एक खिडकी पोर्टल, कालमर्यादित मंजुरी, तक्रार निवारण व्यवस्था आणि कच्च्या मालाचे नियोजन आवश्यक आहे. महाराष्ट्राने एक डिसेंबर २०२६ पूर्वी एक खिडकी पोर्टल व द्विस्तरीय तक्रार निवारण व्यवस्था कार्यान्वित करणे, कच्चा माल संकलकांची नोंदणी करणे आणि जमीन वाटपाची कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

या धोरणामुळे कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन, स्वच्छ इंधन व सेंद्रिय खतनिर्मिती, खासगी गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळून राज्याची चक्रीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम होणार आहे, असे जेवळीकर यांनी सादरीकरणात सांगितले.

# एसटी बसस्थानकांवरील अस्वच्छतेस विभाग नियंत्रक जबाबदार : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई, दि. २२ : एसटी बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची स्वच्छता राखण्यात हलगर्जीपणा झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. प्रवाशांना स्वच्छ, निरोगी आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देणे ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची मूलभूत जबाबदारी असून, स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित स्वच्छता आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे विभागप्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक आणि विभाग नियंत्रक उपस्थित होते. स्वच्छता अधिभाराच्या बदल्यात दर्जेदार सुविधा द्या एसटी महामंडळ प्रवाशांकडून दोन रुपये स्वच्छता अधिभार आकारते. या अधिभाराच्या बदल्यात प्रवाशांना स्वच्छतेच्या किमान सुविधा उपलब्ध होणे अपेक्षित आहे. त्यामुळे बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवणे आणि प्रवाशांच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांमध्ये स्वच्छतेच्या कामात कोणत्याही प्रकारची कुचराई होता कामा नये. प्रवाशांच्या रास्त अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक दक्षतेने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. प्रसाधनगृहांची नियमित तपासणी करा बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची नियमित तपासणी करावी, स्वच्छतेच्या कामावर सातत्याने लक्ष ठेवावे आणि संबंधित कंत्राटदार संस्थांकडून करारातील अटींनुसार स्वच्छता करून घ्यावी, असे निर्देश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले. स्वच्छतेची जबाबदारी केवळ कंत्राटदारांवर सोपवून चालणार नाही. आपल्या कार्यक्षेत्रातील बसस्थानकांवर नियमित स्वच्छता राखली जात आहे की नाही, याची खातरजमा संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः करणे आवश्यक आहे. प्रवाशांना स्वच्छ सुविधा उपलब्ध करून देण्यात कसूर झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. एसटी ही सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन प्रवासाचा महत्वाचा आधार आहे. त्यामुळे सुरक्षित आणि सुखकर प्रवासासोबतच स्वच्छ बसस्थानके व आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्यास महामंडळाने प्राधान्य द्यावे. प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहनही मंत्री सरनाईक यांनी केले.

# ज्योतिर्लिंग मंदिर परिसरातील रस्ता दुरुस्तीला मंजुरी

नाशिक: आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरच्या श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासकामांना गती मिळणार आहे. मंदिर परिसरातील रस्ता दुरुस्तीच्या कामाला राष्ट्रीय संस्मारक प्राधिकरणाने (छरींळेपरश्र चेपीशपीं -रीींहेीळीूं - छच-) मंजुरी दिली असल्याची माहिती, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली आहे. मंदिर परिसरातील विकास कामांच्या माध्यमातून भाविकांकरिता मंदिर परिसरातील वाहतूक, सुरक्षितता आणि सुविधांच्या सुधारणेच्या दृष्टीने मंदिर प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर आणि परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकास कामांचा आढावा घेण्यासाठी गुरूवार २२ ऑक्टोबर रोजी, राष्ट्रीय संस्मारक प्राधिकरणाच्या माध्यमातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त, नाशिकचे जिल्हाधिकारी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधिकारी तसेच संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी सहभागी होते पायाभूत सुविधांच्या विकास कामांच्या आढावा बैठकीत, राष्ट्रीय संस्मारक प्राधिकरणाकडे सादर करण्यात आलेल्या मंदिर परिसरातील विकासकामांच्या चार प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये रस्ता दुरुस्ती, अत्याधुनिक प्रतीक्षा कक्ष, शौचालय सुविधा, आच्छादित मार्ग आणि विधी भवन इमारतीची दुरुस्ती- नूतनीकरण या कामांचा समावेश होता. विकास कामांविषयी झालेल्या सविस्तर चर्चे नंतर मंदिर परिसरातील रस्ता दुरुस्तीच्या कामाला तात्काळ मंजुरी देण्यात आली. त्यामुळे या कामाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. नियोजित कामांमधून रस्त्यांची आवश्यक दुरुस्ती, रुंदीकरण व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करता येणार आहे. यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांची वाहतूक अधिक सुलभ करण्यास मदत होणार आहे. मंदिर परिसरातील भाविकांसाठी अत्याधुनिक प्रतीक्षा कक्ष आणि शौचालय सुविधा उपलब्ध करणे, आच्छादित मार्ग विकसित करणे तसेच विधि भवन इमारतीची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे या उर्वरित तीन प्रस्तावांवरही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या कामांसाठी आवश्यक तांत्रिक दस्तऐवज सादर केल्यानंतर पुढील अंतिम मंजुरी देण्यात येईल, असे राष्ट्रीय संस्मारक प्राधिकरणाकडून स्पष्ट करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरातील पायाभूत सुविधा सक्षम करणे, भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळणे यासाठी विविध विकासकामांचे नियोजन करण्यात येत आहे. रस्ता दुरुस्तीच्या कामाला मिळालेली मंजुरी या नियोजनातील महत्त्वाचा टप्पा असून, उर्वरित प्रस्तावांना अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर मंदिर परिसरातील सुविधांच्या विकासाला आणखी गती मिळण्याची अपेक्षा असल्याचे जिल्हाधिकारी प्रसाद यांनी म्हटले आहे.

# भ्रष्टाचाराबाबत जनजागृतीसाठी २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह

## भ्रष्टाचारासंबंधी माहिती असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

मुंबई, : भ्रष्टाचारामुळे समाजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दक्षता जनजागृतीसारखे उपक्रम नियमितपणे राबविले पाहिजे. भ्रष्टाचारमुक्त समाज निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रीय सहभाग असणे गरजेचे आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केल्यानुसार राज्यामध्ये २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. कुणीही राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार करताना, भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई येथे संपर्क करावा. तसेच टोल फ्री क्रमांक १०६४, दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९२१२१२,२४९२२६१८, संकेतस्थळ https:// acb.maharashtra. gov.in, B©'ob cbwebmailmahapolice. gov.in, addlcpacbmumbai mahapolice.gov.in आणि ८८२८२४१०६४ या व्हॉट्सप क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी केले आहे.

### नियंता ..

बेधडक रहावे सदा
करूनये उगा चिंता
जरुर करावे चिंतन
सुटेलं अलगद गुंता

दुर्गुण पाही शिराया
भोवताली आकोंता
विकार कैक मातले
शांत करा आकांता

संत सज्ञन संगती
हळूहळू झडे अहंता
दूर होणारं हळहळ
कळता खरी अर्हता

पश्चात्ताप प्रमादांचा
ईश्वरांपाशी ती क्षंता
समस्त मार्ग बंदिस्त
शरणजायचे नियंता

कोणकधी कसे चुके
माहीतअसते अनंता
भरलीभांडारें प्रेमाची
कृपाप्रसाद न निवंता

अतर्क्य तो गणाधिश
कळेना साधु महंता
विघ्नहरेलं विघ्नहर्ता
शरण जाता एकदंता

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### दत्तात्रया ..

कृपा करी श्री हरी
त्रय मुर्ती दत्तात्रया
तवभक्ती ही शक्ती
चिदानंद चिन्मया

माझे जीवन तुझे
आयु तव देवराया
वाहिली तव पाया
अस्थायी रे काया

वैखरी माझी खरी
नाम तुझे घ्यावया
हात व्हावे उत्सुक
रे दानधर्म द्यावया

मन मंदीर देवालय
डोळे प्रदीप समया
सन्मार्गा चालावया
सवय लागो पाया

कान असो अधीर
सत् संग ऐकावया
रूप तुझे पाहताना
उंच होतात भुवया

संस्कारी राहे जीव
संसारी या निर्दया
अंती विलीन तुला
इतकीचं करी दया

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

पान ४ वरून...

## विधान परिषदेच्या पदवीधर

तीक्रम, अशा उमेदवारांच्या नावासमोर असलेल्या पसंतीक्रम या स्तंभामध्ये तुमच्या पसंतीक्रमानुसार २,३,४ इत्यादी आकडे टाकून दर्शवा. कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर आपण फक्त एकच आकडा टाकलेला आहे याची खात्री करून घ्यावी. तसेच तोच आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर टाकलेला नाही याची देखील खात्री करुन घ्यावी. पसंतीक्रम फक्त १,२,३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवावा. एक, दोन, तीन इत्यादी शब्दांमध्ये दर्शवू नये. पसंतीक्रमाचे आकडे भारतीय अंकाच्या १, २, ३ इत्यादींसारख्या आंतरराष्ट्रीय रुपात किंवा ख, खख, खखख इत्यादींसारख्या रोमन रुपात किंवा १, २, ३ अशा देवनागरी रुपात किंवा संविधानाच्या आठव्या अनुसूचीमधील मान्यता दिलेल्या कोणत्याही एका भारतीय भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या रुपामध्ये चिन्हांकित करता येतील. मतपत्रिकेवर मतदाराने आपले नाव, आद्याक्षरे किंवा अन्य शब्द लिहू नयेत किंवा स्वाक्षरी करु नये. तसेच आपल्या अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नये. असे केल्यास आपली मतपत्रिका अवैध ठरेल. पसंतीक्रम दर्शविण्यासाठी तुमच्या निवडीच्या उमेदवाराच्या नावासमोर किंवा द अशी खूण करणे टाळावे. अशा मतपत्रिका बाद करण्यात येतील. पसंतीक्रम फक्त आकड्यांमध्येच दर्शवावा. आपली मतपत्रिका वैध ठरण्यासाठी एकूण उमेदवारांपैकी एका उमेदवारासमोर १ हा आकडा लिहून तुमची पहिली पसंती दर्शवणे आवश्यक आहे. इतर पसंतीक्रम देणे ऐच्छिक आहेत. म्हणजेच इच्छेनुसार दुसरी किंवा पुढील पसंती दर्शवावी.

अशा मतपत्रिका अवैध ठरतील १ हा आकडा टाकलेला नसल्यास. १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर टाकलेला असल्यास. १ हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी टाकलेला आहे याबाबत शंका निर्माण होईल अशाप्रकारे टाकलेला असेल. एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ आणि त्याबरोबर २,३ इत्यादी आकडे देखील टाकलेले असतील. पसंतीक्रम आकड्याऐवजी शब्दांमध्ये दर्शवलेला असेल. मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा लेखन असले, आणि असे आकडे टाकण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेन व्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा टाकलेला असेल, तरी अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

## निवेदनाची दखल ; जालना शहरातील

निवेदन देण्यात आले होते.निवेदनाची दखल घेऊन संबंधित विभागाला कार्यवाही करण्यास सांगितल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी आयुक्त अंजली शर्मा आणि संबंधित विभागाचे आभार व्यक्त केले.जनहिताच्या प्रश्नांवर नागरिकांनी लोकशाही व संवैधानिक मार्गाने निवेदने देऊन पाठपुरावा केल्यास सार्वजनिक समस्यांच्या निराकरणासाठी प्रशासनाचे लक्ष वेधता येते, हा या घटनेतून मिळणारा सकारात्मक संदेश आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

दखल घेत आवश्यक पुस्तके व डेस्कटॉप संगणक लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड व संबंधित विभागाला दिले.

## ०५-औरंगाबाद विभाग

ओळखपत्र, विद्यापीठाद्वारे वितरित मूळ पदवी / पदविका प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले शारीरिक दिव्यांगत्वाचे मूळ प्रमाणपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने जारी केलेले युनिक डिसॅबिलिटी ओळखपत्र (UDID) हे पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार असल्याचे निवडणूक शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी कळविले आहे.

## प्रणय हॉटेल परिसरातील

कचरा साचत असल्याने अस्वच्छता आणि दुर्गंधीची समस्या निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. साचलेल्या कचऱ्यामुळे डासांची उत्पत्ती होण्याची तसेच विविध आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित परिसरातील कचरा तातडीने हटवून नियमित स्वच्छता आणि कचरा संकलनाची व्यवस्था प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ✻मोकाट कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण रस्त्यांवर फिरणाऱ्या मोकाट कुत्र्यांमुळे पादचारी, लहान मुले, महिला आणि दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या समस्येवर महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने नियमानुसार आणि मानवी दृष्टिकोनातून प्रभावी उपाययोजना कराव्यात. तसेच आवश्यकतेनुसार पशुजन्म नियंत्रण आणि लसीकरणाची व्यवस्था करावी, अशी मागणीही श्रीराम सेवा समितीने केली आहे. आयुक्तांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी✻ या सर्व समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी जालना महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्यांची दुरुस्ती, कचऱ्याची विल्हेवाट आणि मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ परिसर उपलब्ध करून देणे आवश्यक असून, भविष्यात अशा समस्या पुन्हा उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी अपेक्षाही समितीने व्यक्त केली आहे. बद्रीनाथ जांगडे अहिर यांनी श्रीराम सेवा समितीच्या वतीने हे निवेदन सादर केले असून, महानगरपालिका प्रशासन यावर कितपत तत्परतेने कार्यवाही करते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

## ऑडिओ क्लिप प्रकरणात

प्रकारे छेडछाड करण्यात आली आहे का, याची निष्पक्ष तपासणी झाल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होण्यास मदत होईल, असे त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट होते. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न संवेदनशील असून, अशा प्रकरणांमुळे समाजात संभ्रम किंवा मतभेद निर्माण होऊ नयेत, यासाठी सत्य समोर येणे गरजेचे आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने चौकशी करावी, अशी भूमिका आमदार अर्जुन खोतकर यांनी मांडली. आता या ऑडिओ क्लिपची तांत्रिक तपासणी होऊन त्यातील सत्य बाहेर येते का आणि चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पदवीधर मतदारसंघ

फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनिक्षेपक, फेरीवाले आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त इतर खासगी वाहनांना मतदान केंद्र परिसरात प्रवेश करता येणार नाही. मतदान केंद्रापासून १०० मीटर परिसरात नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत पाचपेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र, मतदानासाठी रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना हा निर्बंध लागू राहणार नाही. मतदान केंद्र परिसरात ध्वनिक्षेपक, वाद्य वाजविणे आणि मिरवणुका काढण्यासही प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात संबंधित पक्षांचे किंवा उमेदवारांचे चिन्ह प्रदर्शित करणे आणि निवडणूक कामासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी व मतदानासाठी आलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतरांना वैध ओळखपत्राशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हे निर्बंध लागू राहतील. आदेशाचे उल्लंघन होऊ नये यासाठी ध्वनिक्षेपकावरून पोलिसांमार्फत आदेशाची प्रसिद्धी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी व संबंधितांनी या आदेशांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## मंठा तालुक्यात २१ व्या पशुगणनेच्या

पशुसंवर्धनविषयक शासकीय योजनांच्या नियोजनासाठी महत्त्वाची आहे. अशा महत्त्वपूर्ण प्रक्रियेत प्रत्यक्ष सर्वेक्षणाऐवजी चुकीची किंवा अपूर्ण माहिती नोंदवली गेली असल्यास भविष्यातील नियोजनावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

## जालन्यात 'अमृतपेठ

वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकलेच्या वस्तू, कपडे, दागिने तसेच दैनंदिन वापरातील विविध वस्तूंचे स्टॉल्स असणार आहेत. अमृतच्या लक्षित गटातील स्थानिक महिला उद्योजिका, लघुउद्योजक आणि नवउद्योजकांना त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन व थेट विक्री करण्यासाठी या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे, उद्योजकांच्या विक्रीत वाढ करणे आणि ग्राहक व उत्पादक यांच्यात थेट संपर्क निर्माण करणे, हा प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश आहे. सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य दिल्यास उद्योजकांना आर्थिक बळ मिळण्यास मदत होणार आहे.तरी जालना शहरासह परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन स्थानिक उद्योजकांच्या उत्पादनांची खरेदी करावी आणि त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक,अमृत संस्था यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## मॉडिफाइड सायलेन्सर वाहन

दक्षता घ्यावी. जालना पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कटिबद्ध आहेत. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंग संधू, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुक जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हिरवी झेंडी दाखवून मतदान पथकांना केले रवाना

जालना/प्रतिनिधी: ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आशिमा मित्तल यांनी आज (दि.२२) रोजी परतूर उपविभागातील मतदान पथकांना हिरवी झेंडी दाखवून मतदान केंद्रांकडे रवाना केले. परतूर येथील तहसील कार्यालयात यावेळी उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रेंगे, तहसीलदार भारत गंगावणे तसेच निवडणूक कामकाजातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मतदान प्रक्रिया शांततेत, निःपक्षपाती आणि पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या. मतदान दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दूपारी ४ या वेळेत होणार असून, सर्व पात्र पदवीधर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मतदान पथकांना मतदान पेट्या, मतपत्रिका, मतदार यादी, आवश्यक नमुने, नोंदवह्या, शिक्के तसेच इतर निवडणूक साहित्य नियमानुसार सुपूर्द करण्यात आले. साहित्य स्वीकारल्यानंतर त्याची तपासणी करून जिल्ह्यातील सर्व तालुका तहसिल कार्यालयातून देखील मतदान पथके आपापल्या नियुक्त मतदान केंद्रांकडे रवाना झाली आहेत. मतदानासाठी



आवश्यक साहित्याचे वितरण करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक मतदान पथकात नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्यासह आवश्यकतेनुसार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. मतदान केंद्रांवर पोहोचल्यानंतर संबंधित पथके मतदान केंद्राची तयारी, उपलब्ध सुविधांची तपासणी आणि मतदान साहित्याची पडताळणी करणार आहेत. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आज मतदान पथकांचे तिसरे प्रशिक्षण घेवून मतदानाची संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मतदान केंद्रांवरील व्यवस्था, मतदारांची ओळख पडताळणी, मतदानाची नोंद आणि मतदान संपल्यानंतरची कार्यवाही याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या. मतदान प्रक्रियेदरम्यान आचारसंहितेचे पालन करणे तसेच कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेला प्रतिबंध करणे यावर भर देण्यात आला. मतदारांना मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. दिव्यांग आणि इतर गरजू मतदारांना नियमानुसार आवश्यक सहाय्य देण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच मतदान केंद्रांवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, दिशादर्शक फलक आणि आवश्यक मूलभूत सुविधांची उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय ठेवण्यात आला असून, संवेदनशील मतदान केंद्रांबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार आवश्यक खबरदारी घेतली जाणार आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रे व निवडणूक साहित्य विहित प्रक्रियेनुसार जमा करण्याबाबतही पथकांना सूचना देण्यात आल्या आहेत.मतदारांनी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

## विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीत असे करा मतदान...!

छत्रपती संभाजीनगर : भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी येत्या शुक्रवारी २३ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची मतदान पद्धती आणि आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या अन्य सार्वत्रिक निवडणुकातील मतदानाची पद्धती यात मूलभूत फरक आहे. विधानपरिषद निवडणूकीचे मतदान हे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रम नोंदवून घेण्यात येते. जितके उमेदवार निवडणूक लढवित असतील अशा सर्वांपुढे पसंतीक्रम नोंदविता येतो. मतदानाच्या या वेगळ्या पद्धतीमुळे मतदारांनी आणि विशेषत: प्रथमच मतदान करणाऱ्यांनी ही पद्धत जाणून योग्यरितीने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी केले आहे.

**असे करा मतदान**

मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने मतपत्रिकेबरोबर पुरवलेले जांभळ्या (व्हायलेट) रंगाचे स्केच पेनच वापरावे. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल, बॉलपॉईन्ट पेन किंवा अन्य कोणतेही लेखनाचे साधन मतदानासाठी वापरु नये. असे केल्यास तुमची मतपत्रिका अवैध ठरेल. उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभामध्ये तुम्ही प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करा. १ हा आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर द्यावा. निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या विचारात न घेता जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील तेवढे पसंतीक्रम तुम्हाला देता येतील. उर्वरीत उमेदवारांबाबतचा तुमचा पुढील पसं (पान ३ वर)

## निवेदनाची दखल ; जालना शहरातील पथदिवे सुरु आयुक्त अंजली शर्मा यांच्या दखलीनंतर संबंधित विभागाची कार्यवाही; सामाजिक कार्यकर्ते करनाडे यांच्या पाठपुराव्याला यश

जालना/प्रतिनिधी : जालना शहरातील मुंडे चौक ते रामचंद्र आर्य चौक, विवेकानंद हॉस्पिटल परिसर तसेच धाडेश्वर महादेव मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील पथदिवे बंद असल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधारातून ये-जा करावी लागत होती. या परिसरातून महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे या मार्गावरील पथदिवे सुरू करण्याची मागणी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची होती.या



समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्याकडे निवेदन सादर केले होते. तसेच निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयातही सादर केली होती.

निवेदनाची दखल घेत आयुक्त अंजली शर्मा यांनी संबंधित विभागाला या समस्येबाबत कळवून आवश्यक कार्यवाही करण्यास सांगितले. त्यानंतर संबंधित विभागाने कार्यवाही करत १४ ऑक्टोबर २०२६ रोजी परिसरातील पथदिवे सुरू केले. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

सार्वजनिक ठिकाणी पथदिवे सुरू असणे हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि रात्रीच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचे आहे. नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात, सार्वजनिक समस्यांचे निराकरण व्हावे आणि प्रशासनापर्यंत सामान्य नागरिकांचा आवाज पोहोचावा, या (पान ३ वर) उद्देशाने हे

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची परतूर येथील मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहास भेट

जालना/प्रतिनिधी : परतूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज भेट देऊन तेथील सोयीसुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी विद्यार्थीनींशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्यासह वसतिगृहाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. भेटीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी वसतिगृहातील निवास कक्ष, पलंग व गाद्या, स्वच्छता, पिण्याचे पाणी,



भोजनव्यवस्था, स्वच्छतागृहे तसेच परिसराची बारकाईने पाहणी केली. इमारतीची स्वच्छता, खोल्यांमधील व्यवस्था आणि विद्यार्थिनींना पुरवल्या जाणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. ही व्यवस्था यापुढेही सातत्याने उत्तम दर्जाची राहावी, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष विचारपूस केली. वसतिगृह परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे, प्रवेशद्वारावरील देखरेख व रात्रीची सुरक्षा व्यवस्था याबाबत त्यांनी माहिती घेतली. कोणतीही अडचण अथवा असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्यास निःसंकोचपणे गृहपाल किंवा प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी मुलींना केले. उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनीही विद्यार्थीनींशी संवाद साधत पोलीस प्रशासन त्यांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असल्याचा विश्वास दिला व परिसरात आवश्यक दक्षता घेण्याबाबत सूचना दिल्या. संवादादरम्यान विद्यार्थीनींनी अभ्यासिका तसेच संगणकीय शिक्षणसाठी डेस्कटॉप संगणक उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या मागण्यांची जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी तात्काळ (पान ३ वर)

## ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुक पदवीधर मतदानासाठी १० प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरणार

जालना, दि.२२ (जिमाका) : ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुक मतदारसंघातील विधानपरिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीकरिता मतदान करताना मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी जे मतदार ओळखपत्र (एझखउ) सादर करू शकत नाहीत, अशा मतदारांनी त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या (एझखउ) व्यतिरिक्त खालील नमूद पर्यायी कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबत आयोगाने आदेश दिले आहेत. यामध्ये आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, भारतीय पासपोर्ट, राज्य / केंद्र सरकार, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक




स्वराज्य संस्था किंवा इतर खाजगी औद्योगिक संस्थांद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिलेले सेवा ओळखपत्र, खासदार / आमदार / विधान परिषद सदस्य यांना दिलेली अधिकृत ओळखपत्रे, संबंधित शिक्षक / पदवीधर मतदारसंघातील मतदार ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत, त्या शैक्षणिक संस्थांनी जारी केलेले सेवा (पान ३ वर)

## विधिज्ञ अ‍ॅड. बाबासाहेब चिखले यांचे निधन; परतूर शहरावर शोककळा



परतूर/प्रतिनिधी : परतूर येथील ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. बाबासाहेब चिखले यांचे मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परतूर शहरासह परिसरात शोककळा पसरली असून, विविध क्षेत्रांतून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

अ‍ॅड. बाबासाहेब चिखले यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत विधी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली होती. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक आणि डोलारा गावचे माजी सरपंच म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. विविध क्षेत्रांतील त्यांच्या कार्यामुळे त्यांचा मोठा जनसंपर्क होता. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने चिखले कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, आप्तस्वकीय व परिचितांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

दलाचे माजी सरपंच विजय राजे चिखले यांच्यातील वडील होते. अ‍ॅड. बाबासाहेब चिखले यांच्या पार्थिवावर परतूर शहरातील वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने विधी, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील एका ज्येष्ठ व्यक्तिमत्त्वाला शहर मुकले आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयास भेट

जालना/प्रतिनिधी : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज आंबा (ता. परतूर) येथील पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, जालना येथे भेट देऊन विद्यालयातील व्यवस्थेची पाहणी केली. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी परतूर रामेश्वर रेंगे तसेच विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार उपस्थित होते. विद्यालयात मागील काळात रॅगिंगसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी मित्तल यांनी प्राचार्य श्री. पवार यांच्याशी सविस्तर



चर्चा करून आवश्यक सूचना दिल्या. रॅगिंगसारखे प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत, विद्यालयातील रॅगिंगविरोधी समिती सक्रिय ठेवावी, विद्यार्थ्यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी तसेच वसतिगृहांवर सातत्याने देखरेख ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनानेही दक्ष राहावे, अशा सूचना त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांना दिल्या. विद्यार्थ्यांची सुरक्षा व त्यांना भयमुक्त वातावरणात शिक्षण मिळणे हे सर्वाधिक महत्त्वाचे असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.विद्यालयाच्या पाणीपुरवठ्याचा आढावा घेत, विद्यालयास नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होईल यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी जलजीवन मिशनच्या अधिकाऱ्यांना दिल्या.यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यालय परिसरात सुरू असलेल्या नवीन विद्यार्थी वसतिगृहाच्या बांधकामाची पाहणी केली. बांधकामाच्या दर्जात कोणतीही कसूर राहणार नाही याची काळजी घ्यावी, दर्जेदार साहित्याचा वापर करून काम विहित मुदतीत पूर्ण करावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित कंत्राटदारास दिल्या.

## प्रणय हॉटेल परिसरातील समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची श्रीराम सेवा समितीची मागणी



जालना/प्रतिनिधी : जालना शहरातील भोकरदन नाका येथील प्रणय हॉटेल आणि परिसरात रस्त्यावरील खड्डे, ठिकठिकाणी साचलेला कचरा तसेच मोकाट कुत्र्यांच्या समस्येमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे श्रीराम सेवा समितीने म्हटले आहे. या समस्यांमुळे वाहनचालक, पादचारी, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असून, जालना महानगरपालिकेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

भोकरदन नाका हा शहरातील महत्त्वाचा परिसर असून, प्रणय हॉटेल आणि त्याच्या आसपासच्या भागात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता असून, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी, अस्वच्छतेचा प्रश्न परिसरात ठिकठिकाणी (पान ३ वर)